विद्यां ददाति विनयं विनयाद् याति पात्रताम् ॥

नॅक प्रमाणित ‘अ⁺’

महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे

# दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा, जि. जळगांव

(पूर्वीचे - कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा)



















**वरिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| प्रा. डॉ.संध्या एम.सोनवणे | प्राचार्य |
| प्रा. डॉ. के. एन. सोनवणे | उपप्राचार्य |
| प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी | उपप्राचार्य |
| डॉ. एस. ए. वाघ | समन्वयक |

**कनिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| श्री. पी. एस. पाडवी | उपप्राचार्य |
| श्री. ए. एन. बोरसे | पर्यवेक्षक |

# माहिती पत्रक

## 2026-2027

# GOALS & OBJECTIVES

- To provide qualitative education to students in different discipline.
- To guide the students for all round development of their personality.
- To create awareness of social responsibility among the students.
- To prepare the students for self employment in order to overcome the problem of unemployment.
- Commit the students to maintain ecological balance.
- To motivate the students for participation in co-curricular and extra curricular activities.
- To introduce modern technological devices to the students for their advancement.
- To enable the students to guide the masses in the fields of water harvesting and tree plantation.
- To capacitate the students for state and national sports events by providing modern sports infrastructure.
- To prepare the students for communicating modern development in the field of agriculture to the tribal farmers of Satpura Ranges.
- To create balance between educational outputs and social needs.
- To inculcate the habit of self discipline among the students.
- To impart value based education to the students for creating leadership qualities to lead the society in future.
- To prepare the students for providing education to the illiterate masses in the society.
- To inspire the students for creating awareness among the people about the dangers of population explosion.

# हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

आपले महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचे सोनेरी स्वप्न साकार करण्यासाठी आपण या महाविद्यालयाची निवड केल्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

५६ वर्षाच्या ज्ञानोपासनेची उत्कृष्ट परंपरा महात्मा गांधी शिक्षण मंडळाने सन १९६९ साली सुरू केली. या महाविद्यालयाने अविरत परिश्रमाने किमान कालावधीत शिक्षणाबरोबरच क्रीडा, एन.सी.सी., एन.एस.एस. सामाजिक, सांस्कृतिक व आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त केलेला आहे. यात निस्पृह व दूरदृष्टी असलेले संस्थाचालक, गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा फार मोठा वाटा आहे. महाविद्यालयातील ३२ प्राध्यापकांनी पीएच.डी व १२ प्राध्यापकांनी एम.फिल. पदवी संपादन केलेली आहे. एच.एस.सी. बोर्ड व विद्यापीठ स्तरावरही शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा सातत्याने महाविद्यालयाने उंचावलेली आहे.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून व जागतिकीकरणामुळे बदलती परिस्थिती याची जाणीव ठेवून आर्थिक, मनुष्यबळ व्यवस्थापन, संघटन, सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन व राष्ट्रीय भावना अशा संकल्पना रूजविणारे उपक्रमशील महाविद्यालय ही आमची ओळख निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

३५.५ एकराचा नैसर्गिक, शांत, रमणीय परिसर, उत्साहवर्धक वातावरण, भव्य क्रीडा संकुल, सर्व अत्याधुनिक सुविधा व नवनवीन उपक्रम विशेषत: स्पर्धा परीक्षा केंद्र, पं. नेहरू अभ्यास व संशोधन केंद्र, डॉ. आंबेडकर अभ्यास व संशोधन केंद्र, म. गांधी अभ्यास व संशोधन केंद्र, चाणक्य मंडळ, पदव्युत्तर व संशोधनाची सोय, महाराष्ट्र शासनाचा 'वनश्री' प्रथम पुरस्कार, शैक्षणिक अंकेक्षण $A^+$ श्रेणी, उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार उत्कृष्ट रासेयो एकक पुरस्कार प्राप्त महाविद्यालय, तसेच $A^+$ नामांकन मिळणारे एकमेव महाविद्यालय ही आमच्या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत.

महाराष्ट्राच्या उत्तरेस, सातपुड्याच्या पायथ्याशी चोपडा शहरात असलेल्या महाविद्यालयात प्रवेश घेऊन सुजाण, अभिरूची संपन्न व क्रियाशील नागरिक घडविण्याच्या प्रक्रियेत आपण सहभागी होत आहात हे योग्य दिशेने पडणारे पाऊल आहे. महाविद्यालयातील अनेक उपक्रम आपल्या सक्रीय सहभागाची वाट पाहत आहेत. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी आपले यश कामी पडो ही मनोभावे शुभेच्छा !

**प्राचार्य**
**प्रा.डॉ.संध्या एम.सोनवणे**

## महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचालित

# दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालय,चोपडा

### १.१. संस्था

महात्मा गांधी शिक्षण मंडळ, चोपडा ही संस्था सन १९६९ मध्ये चोपडा परिसरातील ग्रामीण आदिवासी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी या उद्देशाने स्थापन करण्यात आली. या संस्थेच्या विविध शाखा कार्यरत असून सर्व मिळून सुमारे १०००० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

### १.२ नॅक प्रमाणीकरण

विश्वविद्यालय अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या बँगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून (NAAC: National Assessment and Accreditation Council) महाविद्यालयाने १९ व २० सप्टेंबर २०२१ मध्ये पुन्हा तपासणी व प्रमाणीकरण करून घेतलेले आहे व महाविद्यालयास A+ श्रेणी प्राप्त झालेली आहे.

### १.३ शैक्षणिक विद्याशाखा

ह्या महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखांचे इ. ११ वी ते पदवी व पीएच्.डी. पर्यंतचे शिक्षण दिले जाते. तसेच एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), एम.एस्सी. (मायक्रोबॉयलॉजी), एम.एस्सी. बॉटनी (प्लांट बायोटेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (प्राणीशास्त्र), एम.एस्सी. (भौतीकशास्त्र), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स), एम.ए. (मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र) एम.ए./ एम.एस्सी. भूगोल व एम.कॉम., एम.बी.एम. (एम.सी.एम.), बी.बी.ए. व बी.सी.ए., एम.बी.ए., एम.सी.ए., या अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. महाविद्यालयात प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, भूगोल, गणित व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांच्या प्रयोगशाळांना संशोधन (पीएच्.डी.) करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच विद्यापीठ मान्यताप्राप्त मराठी भाषा प्रयोगशाळा देखील संशोधकांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याशिवाय यु.जी.सी. मान्यताप्राप्त सर्टिफिकेट कोर्सेस तसेच डिप्लोमा व अॅडव्हान्स डिप्लोमा कोर्सेसची सोय आहे.

### १.४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग

महाविद्यालयात विद्वान, विद्यार्थीनिष्ठ, अनुभवी, उच्च विद्याविभूषित व कार्यमग्न प्राध्यापक वृंद ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. महाविद्यालयाचे प्रशासन कार्यतत्पर, विद्यार्थी प्रेमी व सामाजिक बांधिलकी असणारे आहे.

### १.५ सत्र मंजुरीसाठी महत्त्वाच्या अटी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षात सत्र मंजूर होण्यासाठी खालील गोष्टींचा विचार केला जातो.

१. विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची सरासरी हजेरी ८०% असली पाहिजे.
२. त्याने प्रत्येक विषयासाठी नेमलेल्या स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे समाधानकारकरित्या लिहून पूर्ण केलेली असली पाहिजे.
३. त्याने प्रत्येक सत्राची नियमित फी मुदतीच्या आत भरली असली पाहिजे.
४. सर्व चाचणी परीक्षांना उपस्थित राहून समाधानकारक प्रगती दाखवली पाहिजे.
५. महाविद्यालयात वर्गात व वर्गाव्यतिरिक्त होणाऱ्या कार्यक्रमात विद्यार्थ्याने सक्रीय सहभाग दिला पाहिजे.
६. त्याचे वर्गातील व वर्गाबाहेरील वर्तन शिस्तबद्ध व सभ्य असले पाहिजे. विद्यार्थ्याने नियमाविरूद्ध वर्तन केल्यास त्यास योग्य ती शिक्षा करण्याचा व अंतिमत: प्रवेश रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्राचार्य यांना आहे.

### १.६ विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम

१. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र सतत जवळ बाळगून गळ्यात टाकणे आवश्यक आहे. नसेल तर रुपये ५०/- दंड भरावा लागेल महाविद्यालय परिसरात ट्रीपल सीट मोटर सायकल चालविण्यास मनाई आहे.
२. शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून संस्थेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी गणवेश निश्चित करून देण्यात आलेला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी निश्चित करून दिलेला गणवेश परिधान करून महाविद्यालयात येणे अनिवार्य आहे.
३. **P.G. (M.A., M.Com., M.Sc., M.B.M., M.B.A., M.C.A.)** च्या विद्यार्थ्यांना देखील गणवेश आवश्यक आहे.

**वरिष्ठ महाविद्यालय**

| विद्यार्थ्यांसाठी गणवेश | विद्यार्थिनींसाठी गणवेश |
|---|---|
| शर्ट - स्काय ब्ल्यू, पँट - नेव्ही ब्ल्यू | कुर्ता - स्काय ब्ल्यू , सलवार - नेव्ही ब्ल्यू |

**कनिष्ठ महाविद्यालय**

**विद्यार्थ्यांसाठी गणवेश**
शर्ट - पिस्ता कलर, पँट - डार्क ब्राउन

**विद्यार्थिनींसाठी गणवेश**
शर्ट - पिस्ता कलर, पँट - ब्राउन,ब्लेझर - डार्क ब्राउन कलर

४. महाविद्यालयाच्या आवारात पान, तंबाखू, पान मसाला खाण्यास व धुम्रपान तसेच मादक द्रव्यांचे सेवन करण्यास सक्त मनाई आहे. याविरूध्द वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मुंबई पोलीस नियमावली १९५१ नुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात कोणतेही मंडळ, संघटना, कार्यक्रम अथवा संस्था स्थापन करता येणार नाही.

६. वेळोवेळी नोटीसबोर्डावर लावण्यात येणाऱ्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात, न वाचल्यामुळे आर्थिक किंवा शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास संबंधीत विद्यार्थी जबाबदार राहील.

७. महाविद्यालयाच्या स्थावर मालमत्तेची विद्यार्थ्यांनी योग्य ती जोपासना करावी. तिला सुस्थितीत ठेवण्यास मदत करावी. महाविद्यालयाच्या इमारतींच्या भिंतीवर, दरवाज्यांवर, खिडक्यांवर लिहीणे, खिडक्यांच्या काचा फोडणे, फर्निचरची मोडतोड करणे इ. गोष्टी शिस्तबाह्य समजल्या जातील व अशा विद्यार्थ्यास शिक्षा करण्याचा व प्रवेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना राहील.

८. विद्यार्थ्याने एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

९. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संबंधित कोणतीही माहिती वृत्तपत्रात देण्यापूर्वी मा.प्राचार्य यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

१०. सहल आयोजित करण्यापूर्वी मा. प्राचार्य सो. यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

११. विद्यार्थी / विद्यार्थिनीस महाविद्यालयात कोणी त्रास देत असल्यास त्यासंबंधीची सूचना / माहिती कार्यालयात समक्ष अगर प्राध्यापक किंवा कर्मचारी यांच्या मार्फत प्राचार्यांना द्यावी. वाद भांडणे परस्पर अयोग्य मार्गाने सोडवू नयेत. तसेच त्यासाठी बाहेरील व्यक्तींना महाविद्यालयात आणू नये.

१२. चालू असलेल्या वर्गात आपल्या वागण्याने कुठल्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही याची खबरदारी विद्यार्थ्यांने घेणे आवश्यक आहे

१३. विद्यापीठ अध्यादेशानुसार या महाविद्यालयात दिलेले नियम कार्यालयाची पद्धत व निर्णय विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

१४. रँगिंग हा दखलपात्र गुन्हा आहे. प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रँगिग होईल अशा वर्तणुकीची गंभीर दखल घेतली जाऊन संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

१५. महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी कोठेही अर्धवेळ/पूर्णवेळ नोकरीला नसावा. तसेच त्याने आपल्या विद्यापीठांतर्गत किंवा दुसऱ्या विद्यापीठांतर्गत इतर कुठल्याही महाविद्यालयात प्रवेश घेतलेला नसावा.

१६. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन आणल्यास कंपनस्थितीत ठेवावा. कोणाही विद्यार्थ्यांजवळ मोबाईल वर्गात आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१७. वरील नियमांमध्ये ज्या बाबींचा समावेश नाही, त्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना राहील.

## २. महाविद्यालय व विद्यार्थ्यांकरिता

### २.१ महाविद्यालयातील इमारती

महाविद्यालयाची नैसर्गिक सान्निध्यात प्रशस्त व सुसज्ज इमारत आहे. यात रायगड, प्रतापगड (कार्यालय), सह्याद्री, सरस्वती (ग्रंथालय), देवगिरी (जिमखाना), तोरणा, कावेरी, हिमालय, जंजीरा, सातपुडा, विजयदुर्ग(ग्राहकभांडार), राजगड इत्यादी इमारती आहेत. यात अद्ययावत लेडीज रूम, विद्यार्थिनींसाठी विश्रांतीकक्ष इ. व्यवस्था आहे. महाविद्यालयाचा पुर्ण परिसर (सर्व इमारती) मध्ये सि.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

### २.२ ग्रंथालय

महाविद्यालयाचे समृद्ध ग्रंथालय आहे. ग्रंथालयात सर्व विषयावरील सुमारे ६७,६०० ग्रंथ आहेत. यात क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच अवांतर वाचनाची, सामान्य ज्ञानाची भरपूर पुस्तके आहेत. विद्यार्थ्यांना अनामत रक्कम भरून आपल्या खात्यावर पुस्तके घेता येतात. ग्रंथालयात विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सुसज्ज वाचन कक्ष (Reading Room) उपलब्ध आहेत. यात विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, व्यवसाय मार्गदर्शन व विविध स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून दिली जातात.

ग्रंथालयात माजी विद्यार्थ्यांसाठी अनामत रक्कम भरून वाचन साहित्य पुरविले जाते. ✻ ग्रंथालयातील N-List उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ३९०० E-Journals व ९७,००० E-Books वापरता येतील ✻ पुस्तकाचा शोध घेण्यासाठी OPAC-

(Online Public Access Catalogue) ची सुविधा उपलब्ध आहे. * पुस्तकाची देवाण-घेवाण संगणकाद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे तात्काळ पुस्तके उपलब्ध होतात. * ग्रंथालय विभागात झेरॉक्स सुविधा उपलब्ध आहे. *नवीन विद्यार्थ्यांसाठी Library Orientation Programme अंतर्गत ग्रंथालयाची माहिती देण्यात येईल. ग्रंथालयात CAS व SDI सेवा सुरू करण्यात आली आहे. कॉलेज सोडल्यानंतर एप्रिल व मे दरम्यान ग्रंथालय अनामत रक्कम परत मिळेल. * विद्यार्थ्यांना Pen-Drive मध्ये Electronic Video मिळतील.

**२.३ जिमखाना**

जिमखाना विभागातर्फे सर्व प्रकारच्या देशी, विदेशी खेळांची सोय करण्यात आलेली आहे. महाविद्यालयाचा स्वतंत्र, प्रशस्त जिम्नॅशियम हॉल असून त्यात इनडोअर खेळांची सोय आहे. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र हेल्थ क्लब (जिम) असून त्यात व्यायामाची अत्याधुनिक साधने उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मैदानी खेळांव्यतिरिक्त ४०० मिटर्सचा रनिंग ट्रॅक उपलब्ध आहे. या ट्रॅकवर रोज अनेक विद्यार्थी सकाळ संध्याकाळ शारीरिक शिक्षण संचालकांची मदत घेऊन सराव करीत असतात

**२.४ UGC मुलींचे वसतिगृह**

परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजनकक्षासह वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. विद्यार्थिनींसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी वसतिगृह बांधण्यासाठी रूपये एक कोटी अनुदान मंजूर केलेले असून त्यापैकी ७५ लाख अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरचे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे.

**२.५ श्रीमती अनुसयाबाई साळुंखे सभागृह**

महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन श्रीमती अनुसयाबाई साळुंखे सभागृहात होते. कै. श्रीमती अनुसयाबाई साळुंखे यांनी उदार हस्ते दिलेल्या देणगीतून या सभागृहाची निर्मिती करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम, सेमिनार, व्याख्याने, मार्गदर्शनपर व्याख्याने इ. कार्यक्रमांचे आयोजन या सभागृहात केले जाते.

**२.६ स्मार्ट क्लासरूम**

महाविद्यालयात कार्यालय शेजारी प्रतापगड इमारतीत अत्याधुनिक, आयसीटी बेस स्मार्ट क्लास रूम तयार करण्यात आला आहे. त्यात विविध कार्यक्रम सभा, बैठकी विद्यार्थ्यांसाठी आयसीटी बेस कार्यक्रम घेतले जातात. Interactive Board च्या माध्यमातून प्रभावी व आधुनिक पद्धतीने अध्यापन केले जाते.

**२.७ निसर्गरम्य परिसर**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शुद्ध व नैसर्गिक हवेचा पुरवठा व्हावा, अभ्यासासाठी विस्तृत छाया यासाठी सर्व इमारतींच्या आजूबाजूला व महाविद्यालयाच्या आवारात जाणीवपूर्वक निंबाच्या झाडांची लागवड करण्यात आलेली आहे.

**२.८ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**

विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या हेतूने २००० लि.प्रतितास क्षमतेचे शुध्द पिण्याचे पाणी प्रकल्प (आर.ओ) स्थापन करण्यात आलेला आहे. त्याद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**२.९ सायकल स्टॅण्ड**

विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी, तसेच स्टाफसाठी सायकल व मोटार सायकल पार्कींगसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रत्येकाने आपले वाहन चांगले कुलूप लावूनच आपल्या जबाबदारीवर स्टँडवर लावावे.

**२.१० कॅन्टीन**

निसर्गरम्य वातावरणात व महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी व स्टाफसाठी अल्पोपहाराची व्यवस्था असलेली कॅन्टीनची सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**२.११ प्रयोगशाळा (जनरेटरच्या सुविधेसह)**

महाविद्यालयात केमिस्ट्री, फिजिक्स, झूलॉजी, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, बायोटेक्नॉलॉजी, मायक्रोबायॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, भूगोल, बी.बी.ए., बी.सी.ए., एम.बी.एम.,एम.सी.ए.,बी.सी.ए., या विषयांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध असून यात व्यक्तिगत लक्ष देऊन विद्यार्थ्यांकडून प्रयोग करून घेतले जातात. याशिवाय महाविद्यालयात सुसज्ज संगणकीकृत लँग्वेज लॅब आहे. सर्व प्रयोगशाळांना जनरेटरद्वारे विद्युत पुरवठा करण्यात येतो.

**२.१२ संगणक केंद्र**

महाविद्यालयात प्रथम वर्ष बी.एस्सी. पासून एम.एस्सी. पर्यंत संगणकशास्त्र हा विषय शिकविण्याची सोय आहे. यासाठी

आवश्यक प्रयोगशाळा व संगणककेंद्र सेवा उपलब्ध आहे. संगणक विभागात २५० संगणक उपलब्ध आहेत. इंटरनेटसाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध आहे.

**२.१३ संगीत विभाग**

महाविद्यालयात सन २००६ पासून संगीत विभाग सुरू करण्यात आलेला असून बी.ए. अभ्यासक्रमासाठी सामान्य स्तरावर हा विषय शिकविला जातो. या केंद्राद्वारे महाविद्यालयात व विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी आणि विद्यार्थ्यांच्या गुणसंवर्धनासाठी संगीताचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

**२.१४ राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)**

केंद्रीय शिक्षण व युवक कल्याण विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना राबविली जात असून महाविद्यालयातील २५० विद्यार्थी–विद्यार्थिनींना या योजनेअंतर्गत प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व युवाशक्तीचा उपयोग समाजहितासाठी व विधायक कामांसाठी व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी युवती सभेचीही स्थापना करण्यात आलेली आहे.

**२.१५ राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)**

युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागावी व त्यांना याद्वारे सैनिकी शिक्षणही मिळावे हा एन.सी.सी. चा उद्देश आहे. एन.सी.सी.च्या विविध शिबिरांमध्ये व प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये विद्यार्थ्यांची निवड होत असते. महाविद्यालयाने २०११–१२, २०१२–१३, २०१३–१४, २०१४–१५ व २०१६–१७ सातत्याने आर.डी परेड न्यू दिल्ली येथे जाण्याचा विक्रम नोंदविला आहे. तसेच TSC राष्ट्रीय पातळीवरील कॅम्प मध्ये २०१६–१७ मध्ये सहभाग नोंदविला आहे. महाविद्यालयात दर शनिवारी परेडस् होतात

**२.१६ विद्यार्थी ग्राहक भांडार व झेरॉक्स सेंटर**

महाविद्यालयामध्ये सहकारी तत्त्वावर विद्यार्थी ग्राहक भांडार उघडण्यात आलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे महाविद्यालयाचे विविध अर्ज, परीक्षा अर्ज, प्रॅक्टिकल्सचे जर्नल्स, माहितीपत्रके, स्टेशनरी इ. साहित्य वाजवी दरात उपलब्ध आहे. याचठिकाणी झेरॉक्सचीही सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थी ग्राहक भांडाराची नवीन, स्वतंत्र, व भव्य इमारत महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच बांधण्यात आलेली आहेत. ग्राहक भांडारातुन वाजवी किंमतीत झेरॉक्स करुन मिळतील.

**२.१७ विद्यार्थी विकास विभाग**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव येथील विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यार्थी विकासाचे विविध उपक्रम आयोजित केले जातात. अधिक दुर्बल घटक विद्यार्थी सहाय्य योजना; कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा आणि शिका' योजना, व इतर योजना, स्वयंसिध्दा अभियान प्रभावीपणे राबविण्यात येतात.

**२.१८ वैद्यकीय तपासणी**

महाविद्यालयात प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास वैद्यकीय तपासणी आवश्यक असते. सदरची तपासणी साधारण सप्टेंबर/ऑक्टोबर मध्ये नोटीस बोर्डावर नोटीस लावून करण्यात येते. यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येते.

**२.१९ अभ्यासेत्तर कार्यक्रम**

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या क्रमिक अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्या सुप्त गुणांचा विकास व्हावा यासाठी विविध मंडळे स्थापन करण्यात येतात. याद्वारे त्यांना आपला वैयक्तिक विकास साधता येतो. यात भाषा मंडळ, कला मंडळ, इतिहास मंडळ, वाणिज्य मंडळ, भूगोल मंडळ, विज्ञान मंडळ, युवती सभा इ. मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत.

**२.२० नो व्हेईकल डे, केक फ्री कॅम्पस–ग्रीन कॅम्पस**

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक व आरोग्य विषयक जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून दर शनिवारी 'नो व्हेईकल डे' व वाढदिवस केक कापून साजरा न करता वृक्षलागवड करुन साजरा करण्यासाठी केक फ्री कॅम्पस–ग्रीन कॅम्पस उपक्रम भूगोलशास्त्र विभागामार्फत राबविले जातात.

**२.२१ दिव्यांगासाठी आराम कक्ष** : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरामासाठी कक्ष स्थापन केलेला आहे.

**२.२२ करिअर कट्टा**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''करिअर कट्टा'' हा उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे. त्यामध्ये स्पर्धा परिक्षेत

यश मिळविलेले सनदी अधिकारी स्पर्धा परिक्षेचे मार्गदर्शक करतात. तसेच महाराष्ट्रातील यशस्वी–नामवंत उदयोजक व्यवस्थापकीय कौशल्य, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास याबाबत दररोज उद्‌बोधन करतात. या उपक्रमाचे सभासद शुल्क ३६५/– रुपये तीन वर्षाकरिता आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक विद्यार्थ्यास प्रति वर्ष ०५ या पध्दतीने १५ कोर्स (५० आधुनिक सर्टीफिकेट कोर्स पैकी) मोफत दिले जातात.

महाविद्यालयात स्वतंत्र 'करिअर कट्टा' कक्ष अस्तित्वात आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक प्रा. वाय. एन. पाटील आणि प्रा. ए.एच. साळुंखे यांचेशी संपर्क साधावा. विस्तृत माहीतीसाठी महाविद्यालयाची वेबवाईट www.mgsmasc.ac.in किंवा https://careerkatta.mitsc.co.in यावर भेट द्यावी (७५०७६ ५२५५५)

### २.२३ माजी विद्यार्थी संघ

माजी विद्यार्थ्यांसाठी Alumni Association स्थापन करण्यात आलेले असून माजी विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग दिलेला आहे. माजी विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देतात.

### २.२४ शिष्यवृत्ती

विद्यार्थ्यांसाठी सरकारी नियमानुसार ओबीसी, एस.सी., एन.टी., एस.टी., एस.बी.सी. इ. शिष्यवृत्त्या पदवी/पदव्युत्तर (अनुदानित व विनाअनुदानित विभागासाठी) उपलब्ध आहेत. त्यासाठी देना बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, एच.डी.एफ.सी.चोपडा शाखा येथे विद्यार्थ्याने स्वत:चे बचत खाते (Saving A/c) उघडून इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता वेळेवर करणे बंधनकारक आहे.

एम.एस्सी. व्यवस्थापन कोट्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय नियमानुसार शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही.

**शाहू महाराज शिष्यवृत्ती:** ज्या विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेत ८०% पेक्षा अधिक गुण आहेत, अशा एस.सी./ एस.बी.सी./ एन.टी या संवर्गातील विद्यार्थ्यांना इ. ११ वी व १२ वी या वर्गासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध आहे.

### २.२५ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विशेषत: मागासवर्गीय स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी व त्या परीक्षांची तयारी व्हावी यासाठी यु.जी.सी. मान्यताप्राप्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. यात स्पर्धा परीक्षांबाबत विशेष मार्गदर्शनपर व्याख्याने, मार्गदर्शन वर्ग व चाचणी परीक्षा आयोजित केल्या जातात.

### २.२६ दादासाहेब डॅ.सुरेश जी पाटील स्पोर्टस अॅकेडमी

महाविद्यालयीन व्यायाम, क्रीडा, पोलिस भरती, सैन्य भरती सरावासाठी दादासाहेब डॉ.सुरेश जी पाटील स्पोर्टस् ॲकडमीची सुविधा उपलब्ध.

### २.२७ रिमेडियल कोचिंग

ज्या विद्यार्थ्यांना काही विषयांच्या बाबतीत ज्यादा मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अशा महाविद्यालयीन विशेषत: मागासवर्गीय व अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी रिमेडियल कोचिंगची सोय करण्यात आलेली आहे. या विषयांचे मार्गदर्शन महाविद्यालयीन वेळेव्यतिरिक्त रविवारी केले जाते. सदरच्या केंद्रास यु.जी.सी. ची मान्यता आहे.

### २.२८ नोकरीविषयक मार्गदर्शन केंद्र (Employment Cell)

विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व नोकरीविषयक माहिती उपलब्ध व्हावी यासाठी नोकरीविषयक मार्गदर्शन केंद्र सरू करण्यात आलेले आहे. याद्वारे महाविद्यालयात विविध कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्हूआयोजित केले जातात व विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात येतात. यासाठी मुलाखतीच्या तयारीच्या दृष्टिकोनातून मौखिक परीक्षांची तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. या केंद्राचा लाभ घेऊन महाविद्यालयाच्या विविध शाखांमधील अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत.

### २.२९ महापुरूषांची विचारसरणी रूजविणारी केंद्रे

विश्वविद्यालय अनुदान आयोग मान्यताप्राप्त महात्मा गांधी अभ्यास व संशोधन केंद्र, पं. जवाहरलाल नेहरू अभ्यास व संशोधन केंद्र तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व संशोधन केंद्र महाविद्यालयात सुरू करण्यात आलेले आहेत. यात या महान युगपुरूषांविषयीचे ग्रंथ, त्यांची चरित्रे, त्यांच्या विचारप्रणाली वरील वाङ्मय उपलब्ध आहे. तसेच या केंद्रामार्फत या युगपुरूषांवरील विचार परीक्षा, चर्चासत्रे, व्याख्याने व विविध स्पर्धा यांचेही आयोजन करण्यात येते. व याद्वारे विद्यार्थ्यांना भारताची ऐतिहासिक ओळख करून देण्यात येते.

**२.३० यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र - अभ्यासक्रम**

+ पूर्व तयारी (१० वी पास) + बी.ए.- G01 + बी.कॉम.- G02, एम.ए. (मराठी/हिन्दी/इंग्रजी), डी. एस. एम. (D.S.M.) Diploma in School Management प्रवेश देणे सुरू आहे

**२.३१ स्वयंचलित हवामान केंद्र**

भारतीय हवामान विभागाच्या मार्फत स्वयंचलित हवामान केंद्र उपलब्ध.

## प्रवेशासंबंधी नियम

प्रवेश घेण्यापूर्वी माहिती पत्रकातील सर्व माहिती काळजीपूर्वक वाचावी. माहिती पुस्तिकेसोबत असलेला छापील अर्ज पूर्ण भरून दिल्यावरच प्रवेश देण्यासंबंधीचा विचार केला जाईल.

**प्रवेश घेतांना**

- प्रवेश अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक आहे.
- शाळा सोडल्याचा मूळ दाखला व दोन सत्यप्रती
- मागील वर्षाच्या गुणपत्रकाच्या दोन प्रती
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीच्या प्रमाणपत्राच्या दोन सत्यप्रती द्याव्यात.
- नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा मूळ दाखला (L.C./T.C.) जमा करण्यापूर्वी त्याच्या भरपूर झेरॉक्स प्रती करून ठेवाव्यात. एकदा जमा केलेला मूळ दाखला दिला जाणार नाही.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा मूळ दाखला शासकीय नियमानुसार कोणत्याही सबबीवर परत दिला जाणार नाही.
- द्वितीय व तृतीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत प्रथम / द्वितीय वर्षाचे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.
- मागासवर्गीय व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी एच.डी.एफ.सी., बँक ऑफ महाराष्ट्र किंवा देना बँकेच्या चोपडा शाखेत बचत खाते उघडून त्याचा नंबर प्रवेश अर्जावर अचूक लिहीणे आवश्यक आहे.

**सत्र पध्दत**

विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार कला, विज्ञान, वाणिज्य या वर्गांना सत्र परीक्षा पध्दत (Semester System) लागू करण्यात येत आहे. प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयासाठी ४०/६० गुण अंतर्गत/बहिस्थ याप्रमाणे गुण राहतील. अंतर्गत गुणांसाठी चाचणी परीक्षा देणे बंधनकारक राहील. तसेच उपस्थितीचे देखील गुण असल्यामुळे वर्षभर नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**(विद्यापीठाकडून वरील नियम बदलल्यास सुधारित नियम लागू राहतील.)**

**प्रथम वर्षासाठी पात्रता**

- कोणत्याही शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी संबंधीत शाखेची एच.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- किमान कौशल्यावर आधारित पुढील कोर्सेस घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे विशिष्ट विषय घेऊन प्रथम वर्ष बी.एस्सी. वर्गात प्रवेश घेता येईल.

| | | |
|---|---|---|
| १. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | २. एम.आर.इ.डी. | ३. हॉर्टीकल्चरल |
| ४. क्रॉप सायन्स | ५. प्लान्ट प्रोटेक्शन | ६. डेअरी टेक्नॉलॉजी |
| ७. ॲग्री केमिकल्स | ८. मेडिकल लॅब टेक्निशियन | ९. एक्स रे टेक्निशियन |
| १०. ऑप्थोल्मिक टेक्निशियन | | |

- प्रथम वर्ष बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) ला प्रवेश घेण्यासाठी एच.एस.सी. परीक्षेत गणित विषय घेतलेला असणे आवश्यक आहे.
- प्रथम वर्षाच्या पात्रतेसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा विहीत नमुन्याचा अर्ज कोणतीही खाडाखोड न करता काळ्या शाईने सुवाच्च अक्षरात भरून द्यावा. या अर्जासोबत, (१) इ. १० वी च्या गुणपत्रकाच्या दोन अटेस्टेड प्रती, (२) एल.सी. च्या दोन अटेस्टेड प्रती, (३) इ. १२ वी च्या गुणपत्रकाच्या मूळ व दोन अटेस्टेड प्रती, (४) पासपोर्ट साईज फोटो, (५) कॅरेक्टर सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांनी पात्रता अर्जासोबत रू. १२०/- व खालील कागदपत्रे महाविद्यालयाकडे सादर करावीत. अ) इ. १२ वी परीक्षा अथवा तत्सम मान्यताप्राप्त परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दाखला व गुणपत्रक (मूळ प्रतीसह दोन

सत्यप्रती), ब) स्थलांतरण प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट), क) मागील शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (L.C./T.C.), ड) सद्वर्तनाचा दाखला (कॅरेक्टर सर्टिफिकेट) इ) हजेरी दाखला (अटेंडन्स सर्टिफिकेट)

- प्रवेश अर्जासोबत दिलेल्या तक्त्यानुसार आवश्यक असलेली संपूर्ण फी प्रवेश घेतांनाच भरावी लागेल.
- फी पूर्ण भरलेली नसल्यास संबंधीत विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करणे, सत्र नामंजूर करणे अथवा परीक्षेस बसू न देणे या संबंधीची कारवाई करण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहील.
- सत्र मंजूर झाल्याशिवाय बोर्ड/विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही. सत्र मंजूर होण्याच्या अटी
  - अ) विद्यार्थ्याची प्रत्येक सत्रातील प्रत्येक विषयाची वर्गातील उपस्थिती कमीत कमी ८०% असली पाहिजे.
  - ब) वेळोवेळी होणाऱ्या सर्व चाचण्या/सत्रांत परीक्षांना विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आहे.
  - क) विद्यार्थ्यांची वर्गातील व महाविद्यालयातील वर्तणूक सभ्य, शिस्तीची व सहकार्याची असावी.

**कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश व पात्रतेसंबंधी**

- इ. ११ वी/१२ वी पुनर्प्रवेशाबाबत महत्वाचा शासन आदेश शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांचे पत्र क्र.एसएसएन २०९७/१०६३०/(२७५/९७) म.शि.३ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२, दि.२४/११/९७ अन्वये माध्यमिक तथा उच्चमाध्यमिक स्तरावर एकदा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला असेल तर फक्त लगतच्या वर्षात त्याला त्याच शाळेत अथवा अन्य शाळेत त्याच्या विनंतीवरून पुन्हा प्रवेश देण्यात येईल. पुन्हा प्रवेश देऊनही विद्यार्थी परत अनुत्तीर्ण झाला तर मात्र त्याला बहिस्थ बसावे लागेल.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर राज्यातील सार्वजनिक परीक्षा तसेच भारताबाहेरील इतर देशातील सार्वजनिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात ११ वी, १२ वी च्या वर्गात प्रवेश घेण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळाकडून पात्रता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. यासंबंधीचे छापील अर्ज मंडळ कार्यालयात विकत मिळतात. पात्रता प्रमाणपत्राच्या अर्जासोबत मागील उत्तीर्ण झालेल्या सार्वजनिक परीक्षेची खालीलप्रमाणे (मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत) प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) प्रमाणित केलेला फोटो, २) मागील वर्षी उत्तीर्ण सार्वजनिक परीक्षेचे गुणपत्रक, ३) मागील वर्षी उत्तीर्ण सार्वजनिक परीक्षेचे प्रमाणपत्र, ४) शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर प्रमाणपत्र (T.C), ५) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) ६) प्रतिज्ञापत्र, ७) फी : राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना रू. ३००/- व परदेशातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी रू. ५००/-, ८) उच्च माध्य. १२ वीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास वरील कागदपत्रांबरोबर संबंधीत शिक्षणाधिकाऱ्यांची प्रतिस्वाक्षरीसह शाळा सोडल्याचा दाखला व इ. ११ वी पास असल्याची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे पत्रांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती किंवा छायाप्रती (झेरॉक्स) अर्जासोबत पाठवाव्यात. कागदपत्रांच्या मूळ प्रती नंतर परत करण्यात येतील. पात्रता प्रमाणपत्रे छापील अर्ज भरून सर्व कागदपत्रांसह मंडळ कार्यालयाकडे पाठविण्याची अंतीम मुदत १५ सप्टेंबर असते. त्यानंतर सादर करण्यात येणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. विद्यार्थ्यांनी अर्ज न भरल्यामुळे किंवा उशिरा अर्ज पाठविल्यामुळे बोर्डाकडून त्याचा प्रवेश रद्द झाल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

- कोणतेही कारण न सांगता कोणाचाही प्रवेश अर्ज नाकारण्याचा प्राचार्यांना संपूर्ण अधिकार आहे. एकदा अर्ज नाकारल्यानंतर त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार अथवा प्रत्यक्ष बोलणी केली जाणार नाही. कोणत्याही विद्यार्थ्यास त्याचा हक्क म्हणून महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही.

**महत्त्वाचे**

महाविद्यालयात घेतलेला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास विद्यापीठाच्या/बोर्डाच्या नियमानुसार खालीलप्रमाणे फी परत होऊ शकेल.

१. प्रवेश घेतल्यापासून सात दिवसांचे आत प्रवेश रद्द केल्यास प्रवेश शुल्क सोडून इतर शुल्कात १० टक्के कपात करून उर्वरित फी परत मिळेल.
२. प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश रद्द केल्यास प्रवेश शुल्क सोडून इतर शुल्कात २५ टक्के कपात करून उर्वरित फी परत मिळेल.
३. प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कुठलेही शुल्क परत मिळणार नाही.

**टी.सी./एल.सी./ गुणपत्रक संबंधी सूचना**

१. टी.सी./एल.सी. मिळविण्यासाठी विहीत छापील अर्ज भरून द्यावा.
२. अर्जासोबत मागील परीक्षेच्या गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत जोडावी व ग्रंथालयातून बाकी नसल्याबाबत शेरा घ्यावा

३. अर्जातील रकाने संपूर्ण भरल्याची खात्री करून घ्यावी.

४. अर्ज मा.प्राचार्यांकडून मंजूर करून आवश्यक शुल्क भरून संबंधीतांकडे दिल्यावर दोन दिवसांनी शाळा सोडल्याचा दाखला (L.C./T.C.) मिळेल.

५. सेमिस्टर प्रमाणे गुणपत्रक वाटप संबंधी नोटीस बोर्डावर वेळोवेळी सूचना लावण्यात येईल. सुचने प्रमाणे प्रत्येकाने गुणपत्रक घ्यावे. गुणपत्रक उशिराने घेतल्यास प्रत्येक महिन्याला रु.१०/- विलंब शुल्क आकारले जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**स्थानांतर प्रमाणपत्र शुल्क** (L.C./T.C.) **पुढीलप्रमाणे**

अ) महाविद्यालय सोडल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत रू. २०/-, सहा महिन्यानंतर परंतु तीन वर्षाच्या आत रू. ५०/-, तीन वर्षानंतर रू. १००/- व पाच वर्षानंतर रू. २००/- फी राहील. एकदा विद्यालयातून (L.C./T.C.) काढल्यानंतर ते काळजीपूर्वक जपून ठेवावे. हरविल्याच्या कुठल्याही सबबीवर दुसरे (L.C./T.C.) दिले जाणार नाही.

ब) इतर कोणत्याही प्रमाणपत्रासाठी रू. १०/- शुल्क आकारले जाईल.

क) विद्यार्थ्यांनी फी भरलेल्या पावत्या महाविद्यालयाचे टी.सी. घेईपर्यंत जपून ठेवाव्यात.

**ग्रंथालय नियमावली**

१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर ग्रंथालयातून ओळखपत्र तयार करून घ्यावे.

२) ग्रंथालयात ओळख पत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ओळखपत्र हरविल्यास रू. ५०/- भरून नवीन ओळखपत्र ग्रंथालयातून तयार करून घ्यावे.

३) सभासद विद्यार्थ्यांनी पुस्तकाची देवाण-घेवाण करण्यासाठी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे यावे.
ज्युनिअर कॉलेज - सोमवार, मंगळवार
सिनिअर कॉलेज - बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार

४) घरी वाचावयास/अभ्यासास घेतलेले पुस्तक जास्तीत जास्त घेतलेल्या दिवसापासून सात दिवस नावावर ठेवता येईल. आठव्या दिवशी पुस्तक जमा करावेच लागेल. पुस्तक जमा न केल्यास पुढील प्रत्येक दिवसाला एक रूपया प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

५) ग्रंथालयातून पुस्तक नेतांना पाने तपासून घ्यावीत. पुस्तकात काहीही लिहू नये, तसेच खूणा करू नये. पाने फाडल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

६) पुस्तक हरवल्यास/खराब झाल्यास पुस्तकाची दुप्पट किंमत किंवा तेच नविन पुस्तक द्यावे लागेल.

७) विद्यार्थ्यांनी परीक्षा संपल्याबरोबर ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके त्वरीत परत करणे आवश्यक आहे.

८) वाचनकक्षाचा लाभ घेण्यासाठी ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

९) ग्रंथालयाच्या आवारात व पुस्तक देवाण-घेवाण करतांना शांतता पाळावी.

१०) ओळखपत्राशिवाय नोड्यूज प्रमाणपत्र मिळणार नाही.

११) ग्रंथालयात विद्यार्थ्यांची वर्तणुक सभ्य व शिस्तीची असावी.

१२) ओळखपत्रावर घेतलेले सर्व प्रकारचे वाचनसाहित्य त्याच दिवशी परत करावे. अन्यथा प्रत्येक दिवसाला रू. ५/- प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१३) महाविद्यालय सोडल्यानंतर एका वर्षानंतर लायब्ररी डिपॉझीट मे महिन्यात परत करण्यात येईल.

**प्रवेश घेण्याची पध्दत**

१) प्रथम विद्यार्थी ग्राहक भांडारातून प्रवेश फार्म व इतर कागदपत्रे घ्यावीत.

२) सदर फॉर्म स्वत: भरून संबंधीत प्रवेश समितीकडून तपासून घ्यावा.

३) तपासलेला प्रवेश अर्ज सर्व कागदपत्रांसह कॅशियर कडे रक्कमेसहीत देऊन रोल नंबर घ्यावा.

४) सदर पावती शिक्षण पूर्ण होईपर्यंत सांभाळून ठेवावी.

५) रोल नंबर पावती, आयकार्ड मिळाले म्हणजे प्रवेश झाला असे समजावे.

* **महत्वाची सूचना : अंतीम वर्षाच्यां परीक्षेचे गुणपत्रक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याच वर्षी महाविद्यालयातून न्यावेत. अन्यथा ते सांभाळण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.**
**गुणपत्रक घेण्यापूर्वी संबंधितांनी फी निरंक करावी.**

# DADASAHEB DR. SURESH G. PATIL COLLEGE, CHOPDA
## FYBA Admission 2026-27 as per NEP-2020

| | | | AEC. AEC and IKS | CC | |
|---|---|---|---|---|---|
| | **M1 / M2 / M3** | **OE** | | **Sem I** | **SemII** |
| **Select any 2 Subject** | Marathi | Select any one among the following **(SEM I & II)** | **SEM I :** | **CC - I** | **CC - II** |
| | Geography | | | | |
| | Politics | | **AEC 1:** ENG 113 : English for All - Oral Communication | Select any one | Select any one |
| | Economics | | | | |
| | Music | | | | |
| | | **Science OE :** | **VEC -1:** ES-115: Environmental Studies | A) NCC -1 | A) NCC -2 |
| | | 1. BO - 114 & 124 | | B) NSS -1 | B) NSS -2 |
| | | 2. CH - 114 & 124 | | C) Sports -1 | C) Sports -2 |
| | | 3. CS - 114 & 124 | | D) Cultural -1 | D) Cultural -2 |
| **Select any 1 Subject** | English | 4. EL - 114 & 124 | **IKS -115:** IKS (Generic) | E) Student Welfare - 1 | E) Student Welfare - 2 |
| | Hindi | 5. MT - 114 & 124 | | F) Yoga | F) Human Rights and Environment Law |
| | Psychology | 6. MB - 114 & 124 | | G) IPDC -1 | G) IPDC -2 |
| | History | 7. PH - 114 & 124 | ------------------------------ | | |
| | | 8. ZO - 114 & 124 | | | |
| | | 9. BT - 114 & 124 | **SEM II:** | | |
| | | 10. GG-114 & 124 | | | |
| | | **Commerce OE :** | **AEC-2:** ENG 123: English for AII-Written Communication | | |
| **Note :** 2 Language + 1 Social Science **Or** 2 Social Science + 1 Language **Or** 1 Language + 1 Soc, Science + 1 Music | | 11. 114A Fundamentals of Accounting - 124A<br>12. 114B Cooperative Law and micro finance - I & 124 B<br>13. 114C Basics of Stock markets & 124 C | **VEC -2 :** IC-125: Constitution of India | | |

## FYBA Subject

| Sr.No. | Subject | Remarks |
|---|---|---|
| 1 | Marathi | **महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या ९ विषयांपैकी केवळ ३ विषय विद्यार्थ्याने निवडावे.**<br>● जर २ भाषा निवडल्या तर १ सामाजिक शास्त्र विषय घेणे आवश्यक.<br>● जर २ सामाजिक शास्त्रातील विषय निवडले तर १ भाषा विषय घेणे आवश्यक.<br>● जर Music विषय निवडला तर १ भाषा व १ सामाजिक शास्त्र विषय निवडणे आवश्यक आहे. |
| 2 | Hindi | |
| 3 | English | |
| 4 | Geography | |
| 5 | Politics | |
| 6 | Economics | |
| 7 | Psychology | |
| 8 | History | |
| 9 | Music | |

## महाविद्यालयात शिकविले जाणारे विविध अभ्यासक्रम व विषय (वरिष्ठ महाविद्यालय)

| | |
|---|---|
| **द्वितीय वर्ष कला /** (SYBA) | **मुख्य विषय –** F.Y.B.A. च्या M1, M2, M3 पैकी एक विषय मुख्य विषय म्हणून निवडावा.<br>**मायनर विषय –** उरलेल्या दोन विषयांमधून (M1,M2,M3 पैकी) एक मागील वर्षा प्रमाणे<br>**इतर विषय –** OE, AEC (MI 2) |
| **द्वितीय वर्ष** | **विषय – स्पेशलसाठी**<br>**II Semi -** 1) DSC -7, 2) DSC -8, 3) DSC -9, 4) Min -1, 5) VSC -1, 6) SEC-1, 7) AEC-3 (MIL), 8) C.C<br>IV Semi - 1) DSC -10, 2) DSC - 11, 4) Min -2, 5) VSC -2, 6) SEC-2, 2) AEC-4 (MIL), 8) OJT / P.W/ Filed Work |
| **तृतीय वर्ष कला** (सत्र पध्दत) | विद्यार्थ्याने जो विषय स्पेशल घेतला असेल. त्या विषयातील विषय विभाग प्रमुखांच्या मार्गदर्शनात घेणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय वर्षाचा मायनर विषय आवश्यक आहे. |
| **पदव्युत्तर विभाग** (**NEP-2020**) | **एम.ए. (विना-अनुदानित) :-** १) मराठी २) इंग्रजी ३) अर्थशास्त्र ४) राज्यशास्त्र ५) एम. ए/ एम.एस्सी – भूगोल |

# DADASAHEB DR. SURESH G. PATIL COLLEGE, CHOPDA
## FYB.Com Admission 2026-27 as per NEP-2020

## Semester - I

| Level (Semester) : 4.5 (I) | | |
|---|---|---|
| **Compulsory** | **Course** | |
| **DSC - 1 (M 1)** | **111 :** Financial Accounting | |
| **DSC - 2 (M 2)** | **112 :** Economics of Demand & Supply Function | |
| **DSC - 3 (M 3)** | **113 :** Computing Skills | |
| Open Electives (OE)-1 Select any one from other Faculty by Commerce Students i.e. from Humanities | 1. MAR - 114 2. ENG - 114,<br>3. HIN - 114 4. GEO - 114<br>5. POL - 114 6. ECO - 114<br>7. HIS - 114 8. PSY - 114 | |
| | OR | |
| Open Electives (OE)-1 Select any one from other Faculty by Commerce Students i.e. from Science Stream | 1. BO - 114 2. CH - 114<br>3. CS - 114 4. EL - 114<br>5. MT - 114 6. MB - 114<br>7. PH - 114 8. ZO - 114<br>9. BT - 114 | |
| AEC - 1 | **115 :** English for AII - I | |
| IKS - 1 | **115 :** भारतीय ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान व कला | |
| VSC-1 | **116 A :** Corporate Law & Secretarial Practice | |
| (Any one Course | **116 B :** Marketing & Advertising | |
| from the Basket | **116 D :** Principles & Practices of Banking - I | |
| Select any one<br>CC-1 | **117 A :** NCC - 1<br>**117 B :** NSS -1<br>**117 C :** sports - 1<br>**117 D :** Cultural Activities 1<br>**117 E :** IPDC - 2<br>**117 F :** Student welfare Activity -1<br>**117 G :** Yoga | |
| Cumulative Credits/Sem | -- | |

## Semester - II

| Level (Semester) : 4.5 (II) | | |
|---|---|---|
| **Compulsory** | **Course** | |
| **DSC - 4** | **121 :** Cost Accounting | |
| **DSC - 5** | **122 :** Economics of Market Structure & factor Pricing | |
| **DSC - 6** | **123 :** Financial Market | |
| Open Electives (OE)-2 Select any one from other Faculty by Commerce Students i.e. from Humanities | 1. MAR - 124 2. ENG - 124<br>3. HIN - 124 4. GEO - 124<br>5. POL - 124 6. ECO - 124<br>7. HIS - 124 8. PSY - 124 | |
| | OR | |
| Open Electives (OE)-2 Select any one from other Faculty by Commerce Students i.e. from Science Stream | 1. BO - 124 2. CH - 124<br>3. CS - 124 4. EL - 124<br>5. MT - 124 6. MB - 124<br>7. PH - 124 8. ZO - 124<br>9. BT - 124 | |
| AEC - 2 | **125 :** English for AII - II | |
| VSC-2 | **126 A :** Corporate Regulatory Framework | |
| (Any one Course | **126 B :** Digital Marketing | |
| from the Basket | **126 D :** Principles & Practices of Banking - II | |
| Select any one<br>CC-2 | **127 A :** NCC - 2<br>**127 B :** NSS -2<br>**127 C :** sports - 2 2<br>**127 D :** Cultural Activities 2<br>**127 E :** IPDC - 2<br>**127 F :** Student welfare Activity -2<br>**127 G :** Human Rights & Environment Law<br>**127 H :** market Survey for Experimental Learning | |
| Cumulative Credits/Sem | -- 22 | |

# DADASAHEB DR. SURESH G. PATIL COLLEGE, CHOPDA

## SYB.Com Admission 2026-27 as per NEP-2020

## Semester - III

| Semester III (Level 5.0) Course Structure | |
|---|---|
| **Compulsory** | **Course** |
| **MAJOR - Disclpline Specific Core (DSC) Select Any one Major** | |
| **Option 1 :** | Accountancy |
| **DSC -7 (211 A)** | Corporate Accounting - I |
| **DSC -8 (212)** | Understanding Classical Views on Macro Economics & |
| | Investment Function |
| **Option 2 :** | Advanced Costing |
| **211 B** | Cost & Management A/c - I |
| **212** | Understanding Classical Views on Macro Economics & |
| | Investment Function |
| **Option 3 :** | Business Administration |
| **DSC -7 (211 C)** | Principles of Management - I |
| **DSC -8 (212)** | Understanding Classical Views on Macro |
| | Economics & Investment Function |
| **ELECTIVE - Discipline Specific Elective (DSE)** Select Any One Minor | |
| **213 A** | Computing Management |
| **213 B** | Modem Banking & Financial System - I |
| **GENERIC / OPEN ELECTIVE (GE/OE)** | |
| For Students from Other Disciplines / Departments (Select One) | |
| **214 A** | Marathi, Hindi, Economics, Politics, History, Geography, |
| | English, Psychology |
| **214 A** | Physics, Chemistry, Electronics, Computer, Science, |
| | Botany, Zoology, Microbiology, Biotechnology |
| **VEC -1 Value Education Course** | |
| 215 | Enviromental Studies |
| **SEC -1 Skill Enhancement Course (Select one)** | |
| **216 A** | Computerized Accounting Procedures |
| **216 B** | Fundamentals of Security Analysis |
| **AEC -3 - Ability Enhancement Course (MIL) (Select One)** | |
| **217 A** | Business Communication |
| **217 B** | Vyavsaik Hindi - I |
| **217 C** | Vyavharik Marathi - 2 |
| **CC - III - Co-curricular Component (Select one)** | |
| | A) NCC, B) NSS, C) Sports, D) Cultural Activity, |
| | E) Cyber Sceurity, F) Community Engagement Programme |

## Semester - IV

| Category | Course Code | Course Titile |
|---|---|---|
| MAJOR (DSC) | | Slecty Any one Major |
| Advanced Accountancy | 221 A | Corporate Accounting - II |
| Advanced Costing | 221 B | Cost & Management A/c - II |
| Administration | 222 | Advanced Macro Economics |
| | 221C | Principles of Management - II |
| | 222 | Advanced Macro Economics |
| ELECTIVE (DSE) | | Slecty Any one Minor |
| Computer Management | 223A | Ai for Business (Practical) |
| Banking & Finance | 223B | Modem Banking & Financial System-II |
| OE - 4 | | For Other Department Students (Select One) |
| | 224A | Marathi, Hindi, Economic, Politics, |
| | | History, English, Geography, |
| | | Psychology |
| | 224A | Physics, Chemistry, Electronic, Comp. Science, Zoology, Botany, Microbiology, |
| VES-2 | | Select One Value Education Subject |
| | 225A | Constitution of India |
| | 225B | Business Ethics and Values |
| AEC-4(MIL) | 226A | Professional Communication |
| | 226B | Vyavsaik Hindi - II |
| | 226C | Vyavsaik Marathi - II |
| OJT/Int | 227 | Internship |
| CC-IV | | Select One Co-curricular Course |
| | | A) NCC/ B) NSS / C) Sports / |
| | | D) Cultural Activities / |
| | | E) Communication Skill |
| | | Cumulative Credits This Semester |
| | | B.Com. UG Diploma Total |
| | | Exit Option : UG Diploma (88 Credits) + 4 Credit NSQF / Internship OR Contin |

# DADASAHEB DR. SURESH G. PATIL COLLEGE, CHOPDA
## TYB.Com Admission 2026-27 as per NEP-2020

### SEMESTER - V

| Level (Semester) : 5.5 (V) | | | | |
|---|---|---|---|---|
| **VERTICALS** | | | **Course** | **Credits** |
| | | | **Select Any One Major Out of Four Choices** | **10 Credit** |
| Major | DSC -11 | Advanced Accountancy | 311 A : Advanced Accounting - I<br>312 : Indian Economic Scenario - I<br>313 A : Principle and Practice of Auditing & Its History in Indian Context (IKS) | 4<br>4 |
| | | Business Administr-ation | 311 C : Human Resource Management<br>312 : Indian Economic Scenario - I<br>313 C : Indian Taxation System & Auditing (IKS) | 4<br>4<br>2 |
| | | DSE - 1 | 314 A : Entrepreneurship Development<br>314 B : Startup and Innovation | 2 |
| | | Select Any One Major Out of Three Choices | | 2 Credit |
| Minor | MIN -3 | International Business Management | 315 A : International Financial Markets | 4 |
| | | Banking & Finance | 315 B : Advanced Banking - II | |
| | | Auditing & Taxation | 315 C : Direct Taxation (Income Tax) | |
